४

महाराष्ट्र टाइम्स

नागपूर ■ मंगळवार, ८ ऑक्टोबर २०१३

nag.mtonline.in

# 'वसुंधरा जगवा, संवर्धन करा'

म. टा. प्रतिनिधी ■ यवतमाळ

## किर्लोस्कर-वसुंधरा महोत्सव

वने, वन्यजीव आणि पर्यावरण ही निसर्गचक्राची परस्परपूरक अंगे आहेत. अलीकडे अवघी जीवसृष्टीच संकटात सापडली आहे. तिचे मोल आजच्या पिढीला कळावे, या तिन्ही घटकातील नाते कळावे यासाठी किर्लोस्कर-वसुंधरा महोत्सव यवतमाळात आयोजित करण्यात आला. वसुंधरा जगवा, तगवा आणि भावी पिढीसाठी तिचे संवर्धन करा, असा संदेश या माध्यमातून देण्यात आला.

वनविभाग, रोटरी क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. महोत्सवानिमित्त आतरराष्ट्रीय दर्जाचे निसर्ग, वन्यजीव, पर्यावरण या विषयावरील लघुपट अप्सरा व सरोज या चित्रपटगृहात दाखविण्यात आले.

लोकनायक बापूजी अणे महिला महाविद्यालयात छायाचित्र प्रदर्शन झाले. यात प्रसिद्ध निसर्ग छायाचित्रकार मिलींद धुर्वे व जयंत अत्रे यांनी काढलेली दोनशेहून अधिक छायाचित्र होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन मुख्य वनसंरक्षक गुरमे यांच्या हस्ते झाले. वनसंपदा व वन्यजीव वाचविण्यासाठी वनविभागाबरोबरच नागरिकांचे सहकार्य आवश्यक असल्याचे गुरमे यांनी सांगितले.

कार्यक्रमादरम्यान वन्यजीव संरक्षणासाठी सातत्याने झटणारे कोब्रा ॲडव्हेंचर ॲण्ड नेचर क्लबचे सचिव श्याम जोशी यांना 'वसुंधरा मित्र' तर वृक्षतोडीविरुद्ध प्रबोधन करणारे नरेंद्र पवार यांना 'वसुंधरा ग्रीन टीचर' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष दिवाकर पांडे, प्राचार्य डॉ. आशा देशमुख, राजलक्ष्मी पतसंस्थेचे अध्यक्ष अरविंद तायडे, किर्लोस्कर वसुंधरा, पुणेचे महोत्सव संचालक वीरेंद्र चित्राव यांच्यासह आयोजक राजन टोंगो, जयंत कर्णिक, प्रा. अनंत पांडे उपस्थित होते. संचालन स्वाती जिरापुरे यांनी केले.



वृक्षतोडीविरुद्ध प्रबोधन करणारे नरेंद्र पवार यांना 'वसुंधरा ग्रीन टीचर' पुरस्काराने सन्मानित करताना मान्यवर.

मातृभूमि

बुधवार ९ ऑक्टोबर २०१३/

# वन्य जीव संरक्षण ही सामूहिक जबाबदारी -मुख्यवनसंरक्षक गुरमे

## ■ श्याम जोशी व नरेंद्र पवार वसुंधरा पुरस्काराने सन्मानित ■

मातृभूमि वृत्तसेवा

यवतमाळ/दि.८ (प्रति.)

भारतात दिवसेंदिवस वनसंपदा व वन्यजीव यांची होत असलेली हानी ही बाब निश्चितच गंभीर आहे परंतु केवळ वनविभागावर वन्यजीवांच्या रक्षणाची जबाबदारी सोपवून प्रश्न सुटणार नाही. देशातील प्रत्येक नागरिकाने वन्यजीव संरक्षणाच्या दृष्टीने जागरुक राहुन ती आपलीही जबाबदारी आहे हे समजून घेणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन मुख्य वनसंरक्षक प्रादेशिक व. वि. गुरमे यांनी केले.

स्थानिक लो. बा. अणे महिला महाविद्यालय येथे सुरु असलेल्या किर्लोस्कर वसुंधरा छायाचित्र प्रदर्शनीच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. याच कार्यक्रमात वन्यजीव संरक्षणासाठी अहोरात्र निरपेक्षपणे कार्य करणारे कोब्रा ॲडव्हेंचर ॲण्ड नेचर क्लबचे सचिव श्याम जोशी यांना वसुंधरा मित्र पुरस्काराने तर होळी प्रबोधनाचे शिल्पकार व प्रसिद्ध पर्यावरण प्रेमी नरेंद्र पवार यांना वसुंधरा ग्रीम टिचर या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

दिवाकरराव पांडे यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमास उपवनसंरक्षक प्रमोदचंद लाकरा, वसुंधरा महोत्सवचे संचालक विरेंद्र चित्राव, प्राचार्य डॉ. आशाताई देशमुख, राजलक्ष्मीचे अध्यक्ष अरविंद तायडे, अशोक कोठारी, परेश लाठीवाला प्रामुख्याने उपस्थित होते.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजन टोंगो तर आभार बाबा देशपांडे यांनी केले. दोन दिवस चाललेल्या या महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी वनविभाग, रोटरी क्लब सोबत परिचय चे राजन टोंगो, अनंत पांडे, जयंत कर्णीक, बाबा देशपांडे, रविंद्र खराबे, स्वाती जिरापूरे आदिंनी परिश्रम घेतले.